मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

निविदा सुचना

कार्यकारी अभियंता/ ई-१ विभाग/ मुं. इ. दु. व पु. मंडळ यांचेमार्फत खालील कामांकरीता म्हाडा / मनपा / सा.बां.वि. / कें.सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम (रूपयांत)	इसारा रक्कम १% (रूपयांत)	सुरक्षा अनामत (५०% सुरवातीस व ५०% चालू देयकातून) (रूपयांत)	कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा) (जीएसटी सह) (रूपयांत)	कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ	मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ	काम करावयाचा कालावधी	ठेकेदाराचा नोंदणी वर्ग
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१.	इ. क्र. २८४-ए, रे रोड, माझगांव, मुंबईचे दुरुस्ती काम [ई- ५६८३(१अ)] (आमदार निधी)	३,९४,६१६	३,९४६	४,००० ४,०००	५९०	२३/११/२०२६ ते ३०/११/२०२६ सकाळी ११ ते दुपारी १.०० पर्यंत	३०/११/२०२६ ते ०४/१२/२०२६ सकाळी ११ ते दुपारी १.०० पर्यंत	१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
२.	इ. क्र. ४, प्रायव्हेट लेन, माझगांव मुंबईचे दुरूस्ती काम [ई- ६८५९-६०] (आमदार निधी)	३,९८,५८४	३९८६	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
३.	इ. क्र. ४१, हॉस्पीटल लेन,डॉकयार्ड रोड, मुंबईचे दुरूस्ती काम [ई- ५६८१-८२] (आमदार निधी)	३,९७,११३	३९७१	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
४.	इ. क्र. ३२ गणपावडर रोड, माझगांव, मुंबईचे दुरुस्ती काम [ई- ५२२३(१)] (आमदार निधी)	३,१२,९५०	३,१२९	३,५०० ३,५००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
५.	इ. क्र. १, २-२A, इंडीया युनायटेड मिल नं. २ आणि ३, टि. बी. कदम मार्ग, माझगांव, मुंबइचे दुरुस्ती काम [ई- ८२५४(१ब/२ब)] (आमदार निधी)	३,८६,५९१	३,८६६	४,००० ४,०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
६.	इ. क्र. ९, गणपावडर रोड, माझगांव, मुंबईचे दुरूस्ती काम [ई- ५१७५] (आमदार निधी)	३,९६,५८९	३९६६	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
७.	इ. क्र. २८-३०, मुझावर पाखाडी रोड आणि १- ७, नवाब टँक रोड, माझगांव, मुंबईचे दुरूस्ती काम. [ई- ५४५४-५५] (आमदार निधी)	३,९६,५२९	३९६५	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
८.	इ. क्र. ४२-४२एफ, डॉकयार्ड रोड, माझगांव रोड, माझगांव , मुंबईचे दुरूस्ती काम [ई- ५७५८(३ए)]	३,९६,४९८	३९६४	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील
९.	इ. क्र. ६३-६९ डिलिमा स्ट्रिट आणि नबाब टँक रोड, माझगांव, मुंबईचे दुरूस्ती काम [ई- ६१६१ (१-२)]	३,९५,००६	३९५०	४००० ४०००	५९०			१० महिने	वर्ग-८ व त्यावरील

१. जर निविदा देकार दर अंदाजित निविदा किमतीपेक्षा कमी असतील, तर L१ (प्रथम न्युनतम) निविदाकाराने निविदा उघडल्याच्या तारखेपासून ०८ दिवसांत 'अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव' (Additional Performance Security Deposit) जमा करणे आवश्यक आहे. जर तो ही ठेव जमा करण्यात अयशस्वी ठरला, तर L२ (द्वितीय न्युनतम) निविदाकारास विचारण्यात येईल; आणि जर L२ निविदाकार, L१ ने दिलेल्या दरांपेक्षा कमी दराने (कमी टक्केवारीवर) काम करण्यास तयार असेल, तर त्याची निविदा स्वीकारली जाईल. अधिक माहितीसाठी कृपया सविस्तर निविदा सूचना (Detailed Tender Notice) पहा.

२. कोऱ्या निविदा केवळ अद्ययावत वैध नोंदणी प्रमाणपत्र, पॅन (PAN) कार्ड आणि पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र या कागदपत्रांच्या मूळ किंवा साक्षांकित छायाप्रत सादर केल्यावरच दिल्या जातील.

३. म्हाडा (MHADA) मध्ये नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदारांनी/ निविदाधारकांनी, त्यांना कोणत्याही सरकारी किंवा निम-सरकारी संस्थेद्वारे काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही, हे नमूद करणारे मूळ शपथपत्र (लागू असल्यास) नोटरीकृत मुद्रांक पत्रावर सादर करावे.

४. कंत्राटदार/ बोलीदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची परिपुर्णता, अचूकता आणि सत्यता यांच्याबाबत ५०० रुपयांच्या मुद्रांक पत्रावर कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) किंवा नोटरी (Notary) यांच्या समक्ष शपथपत्र तयार करून त्याची मुळ प्रत सादर करावी. तसेच सदर या शपथपत्रावर संस्थेचे नाव, निविदा सूचनेचा कालावधी आणि ज्या इमारतीसाठी निविदा सादर केली आहे तिचे नाव शाईने नमूद करणे अनिवार्य आहे.

५. कंत्राटदार/ बोलीदारांनी इसारा (Earnest money deposit) रक्कम ही राष्ट्रीयीकृत/ शेड्युल बँकेने जारी केलेल्या एका वर्षाच्या कालावधीसाठीच्या अल्प मुदत ठेव पावतीच्या स्वरूपात आणि Chief Accounts Officer, M. B. R. & R. Board, Mumbai यांच्या नावे जमा करावी.

६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ या कार्यालयातुन, रकाना क्र. ०६ मध्ये नमूद केल्यानुसार दिल्या जातील आणि रकाना क्र. ०७ मध्ये नमूद केल्यानुसार त्याच कार्यालयात स्वीकारल्या जातील. सीलबंद निविदा रकाना क्र. ०८ मध्ये नमूद केलेल्या अंतिम तारखेला (शक्य असल्यास) दुपारी २:३० नंतर त्याच कार्यालयात उघडल्या जातील.

७. संयुक्त उपक्रमांकडून (Joint ventures) आलेल्या बोली किंवा सशर्त प्रस्तावांचा स्वीकार केला जाणार नाही

८. सक्षम प्राधिकाऱ्याकडे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखीव आहे.

९. कंत्राटदार/ बोलीदाराची नोंदणी निविदा प्राप्त होण्याच्या अंतिम तारखेपासून ०३ महिन्यांच्या कालावधीपर्यंत वैध असावी.

१०. कंत्राटदाराच्या नावे स्वीकृती पत्र (acceptance letter) किंवा कार्यादेश (work order) जारी झाल्यापश्चातही, जर भाडेकरू/ रहिवाश्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) मिळवून संबंधित इमारतीची दुरुस्ती करण्याचे ठरविले, किंवा ती इमारत पुनर्विकासासाठी प्रस्तावित असेल, अथवा भाडेकरू/ रहिवाश्यांची तशी इच्छा असेल, तर अशा परिस्थितीत कंत्राटदार म्हाडा (MHADA) कडे कोणताही नुकसान भरपाईचा दावा किंवा भरपाई मागण्यास पात्र नसेल.

११. कंत्राटदार/ निविदाकाराकडे तत्सम कामांचा किमान ०५ वर्षांचा अनुभव असलेला एक अभियंता आणि इतर आवश्यक पर्यवेक्षक अधिकारी असणे आवश्यक आहे.

१२. उप-कंत्राटदाराचा अनुभव आणि संसाधने (असल्यास) विचारात घेतली जाणार नाहीत.

१३ कंत्राटदार/ बोलीदारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१४. इच्छुक निविदाकारांना शासन निर्णय क्रमांक संकिर्ण- २०२४/ प्र.क्र.०८/ गृनिभू, दि.१४.०२.२०२४ व जा.क्र./ मु.अ१/ काअ-१/ प्रा/ ET-६२४/ ०३.१०.२०२२ मधील तरतुदींचे पालन करावे लागेल.

१५. सदर निविदा (टेंडर) २०२०-२१ च्या शेड्युल दरांवर (SSR) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) २०२२-२३ च्या दरसूचीवर (DSR) आधारित असुन त्यात जीएसटी समाविष्ट नाही. स्विकृत करारनाम्याच्या मुल्यावर जीएसटीचा भरणा केला जाईल.

१६. या निविदा सूचनेतील कामे आमदार निधी (MLA Fund) अंतर्गत प्रस्तावित आहेत. सदर कामे त्वरित सुरू करण्याबाबत माननीय आमदार महोदय आग्रही असल्याने, आवश्यक त्या सर्व मान्यता प्राप्त करून घेऊन पहिल्या बोलीतच ही कामे यशस्वी निविदाकारास सोपवण्याचे प्रस्तावित आहे. सबब जर L१ (प्रथम न्युनतम) निविदाकाराने काम करण्यास नकार दिल्यास त्याची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्याची आणि संबंधित कंत्राटदाराला/ बोलीदाराला काळ्या यादीत टाकण्याची करण्याची कार्यवाही प्रस्तावित केली जाईल.

20/11/2026

कार्यकारी अभियंता
ई-१ विभाग / मुं. इ. दु. व पु. मंडळ